Impact Factor - 6.261 ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL
January-February-March-2019
Vol. – V, Issue-I (B)

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] India

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

This Journal is indexed in :
- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

PRINCIPAL
Shivaji College, HIN...

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

**Impact Factor – 6.261** **ISSN - 2348-7143**

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-February-March-2019

Vol. – V, Issue-I (B)

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist - Nashik [M.S.] India

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

*- Chief & Executive Editor*

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 800/-

# Editorial Board

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV'S Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
**Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)**
**Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)**
**Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)**
**Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)**

**Co-Editors -**

- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, Saudi Arabia.
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar** - BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik.
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon.
- **Prof. Vinay Madgaonkar** - Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik** - Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh** - Associate Professor, CSIBER. Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon
- **Dr. Samjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari
- **Prof. Vijay Shirsath** - Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.]**
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul [M.S.]
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik **[M.S.]**
- **Dr. Hitesh Brijwasi** - Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.]**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar [M.S.]
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.]**

**Advisory Board -**

- **Dr. Marianna kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur** - Chairman, BoS., Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions, **Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal. NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Act. Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**

- **Dr. J. S. More** – BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar**, BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**– BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali**, HOD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** – Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar** – M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

**Published by –**
© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

# अनुक्रमणिका



| अ.क्र. | शीर्षक | लेखक/लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1 | उपेक्षित आदिवासी 'माना' जमातीच्या समस्या व आव्हाने | प्रा.एम.के. नन्नावरे | 05 |
| 2 | १९९० नंतरची मराठी कादंबरी एक अभ्यास | डॉ. संजय पाटील | 13 |
| 3 | आदिवासींचे धर्मांतर –एक भयसूचक वास्तव | प्रा.संदीप चपटे | 18 |
| 4 | शेतकरी आत्महत्यांमागील समाजशास्त्रीय वास्तव | डॉ.मारोती बामणे | 21 |
| 5 | भंडारा जिल्ह्यातील यात्रेतील व्यापारिक स्थितीचा अभ्यास | डॉ.सुरेश बन्सपाल | 26 |
| 6 | महात्मा गांधीजीच्या सत्य व अहिंसा विचारांची प्रस्तुतता | डॉ.बाबासाहेब देशमुख | 69 |
| 7 | महाराष्ट्र राज्य शासनाच्या क्रीडा व युवा धोरण २०१२ संदर्भात काढलेले अध्यादेश | राजेंद्रकुमार देवकाते आणि दीपक देवकाते | 33 |
| 8 | दिव्याची निर्मिती कथा | डॉ.अंजली मस्करेन्हस | 39 |
| 9 | भारतीय अर्थव्यवस्थेवरील जागतिकीकरणाचे परिणाम | डॉ. लता कमलापुरे | 42 |
| 10 | लोकगीतातील स्त्री प्रतिमा | डॉ. गायत्री गाडेकर | 47 |
| 11 | कालिदास आणि भवभूतीच्या साहित्यात प्रतिबिंबीत दाम्पत्यजीवन | डॉ.कलापिनी अगस्ती | 55 |
| 12 | लहुजी साळवे याचे क्रांतीकार्यातील योगदान | डॉ.प्रल्हाद दुधाने | 62 |
| 13 | एकविसाव्या शतकातील स्त्री-आत्मचरित्रातील कर्तृत्व आणि कुटुंबवत्सलता | प्रा.मनीषा हाडपे | 68 |
| 14 | डॉ.मोहमद युनुस यांचे बचत गट विषयक आर्थिक विचार-एक अध्ययन | डॉ.मनोजकुमार भोवते | 73 |
| 15 | संशोधन अहवाल लेखानातील पायऱ्यांचा अभ्यास | प्रा.बी.बी.मोटे | 76 |
| 16 | कविवर्य कुसुमाग्रजांच्या कवितेतील संवैधानिक मूल्य : एक आकलन | प्रा. संजय गोहणे | 79 |
| 17 | बुलडाणा जिल्ह्यातील पर्यटन विकास केंद्राचे अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून अध्ययन | डॉ. जगन्नाथ ढाकणे | 86 |
| 18 | तुकारामांच्या अभंगातील सामाजिक दृष्टी | डॉ.प्रवीण कारंजकर | 91 |
| 19 | बी.एड्. प्रशिक्षणार्थ्याला जीवन कौशल्य व अध्यापन कौशल्य आत्मसात करण्यासाठी ICT एक प्रभावी उपाय | डॉ.दादासाहेब पवार | 94 |
| 20 | विदर्भ विकासाच्या संदर्भात महाराष्ट्र विधिमंडळाच्या नागपूर अधिवेशनाची फलश्रुती | प्रा. वर्षा चंदनशिवे | 97 |
| 21 | दुर्गसम्राट माणिकगडची राजकीय ऐतिहासिकता | डॉ.आर.पी.झनके | 102 |
| 22 | नमुना निवड पध्दतीचा चिकित्सक अभ्यास | डॉ. बालाजी राजोळे | 105 |
| 23 | बालविवाह : एक सामाजिक समस्या | प्रा.बाळकृष्ण रामटेके | 110 |
| 24 | भारतीय सार्वजनिक निवडणुका –एक दृष्टीक्षेप | डॉ.दिगंबर कापसे | 114 |
| 25 | संत जनाबाईची अभंगवाणी | प्रा.प्रवीण घारपुरे | 119 |
| 26 | समाज माध्यमांतील नवप्रवाह | श्रीमती सुमन तरसे | 127 |
| 27 | किशोरवयीन खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा स्पर्धामध्ये येणाऱ्या मानसिक ताण-तणावाचा अभ्यास | प्रा.दीपक देवकाते | 132 |
| 28 | सुरेश भट यांच्या काव्यातील प्रेम जाणीव | डॉ. राजेश देशपांडे | 140 |
| 29 | यवतमाळ जिल्ह्यात स्थानिक स्वराज संस्थांचा उदय-एक विश्लेषणात्मक अध्ययन | डॉ.सुनील चकवे | 148 |
| 30 | नाटक साहित्य प्रवाह : एक अभ्यास | डॉ.विजय केसकर | 152 |

| | | |
|---|---|---|
| 31 | राजन गवस यांच्या 'रिवणावायली मुंगी' या कथासंग्रहातील कृषिजन संस्कृतीचे वास्तव **डॉ.दीपक बावस्कर** | 156 |
| 32 | राजर्षी शाहू महाराजांचे पुरोगामी विचार व कायदे **प्रा.एस.आर.मंझा** | 165 |
| 33 | माध्यमिक शिक्षकांत शिक्षकी व्यवसायाविषयी असणाऱ्या अभिवृत्तीचा अभ्यास **श्रीमती शितल बोनगिरवार आणि डॉ.एच.वाय.देवरे** | 170 |
| 34 | मराठी स्त्रीवादी साहित्याची तत्त्विकता आणि वाटचाल **सौ.भारती निळे , डॉ. धनराज धनगर** | 174 |
| 35 | भारतीय राष्ट्रवाद **प्रा. अर्चना फुलारी** | 181 |
| 36 | नैराश्याच्या गर्तेतून बाहेर पडण्यासाठी खेळ व इच्छाशक्ती **डॉ. के.डी. दापके** | 185 |
| 37 | भांडवलशाही अर्थ प्रणालीचा विकास **डॉ.जगन्नाथ ढाकणे** | 188 |
| 38 | १९१८ते १९६० या कालखंडातील मराठी कथेचे सांस्कृतिक पर्यावरण **डॉ. सुनील निगडे** | 191 |
| 39 | जलनियोजन व जलसाक्षरता : काळाची गरज **डॉ.राजू शिंदे** | 195 |
| 40 | पुणे करार व जयभीम चे जनक बाबू एल.एन.हरदास **प्रा.आशिष थूल** | 198 |
| 41 | योगाद्वारे खेळातील कामगिरी सुधारणे **डॉ. जी.पी.नलगे** | 201 |
| 42 | नामदेव माळीचे समग्र साहित्य : एक चिंतन **डॉ.संगीता शेळके** | 204 |
| 43 | महाराष्ट्रातील कृषिधारकांची आत्महत्या : एक चिकित्सक अध्ययन **डॉ. प्रमोदकुमार नंदेश्वर** | 207 |
| 44 | यादवकालीन संकृती- एक अवलोकन **प्रा. संगीता पवार** | 216 |
| 45 | .महाबळेश्वर इतिहास **डॉ.संजय भोसले** | 219 |
| 46 | आदिवासी स्त्रियांची लोकगीते - एक अभ्यास **डॉ. कल्याण राऊ आढाव** | 223 |
| 47 | हैद्राबाद मुक्तिसंग्रामात दलितांची भूमिका **डॉ.एस.डी.सावंत** | 228 |
| 48 | संत तुकारामाच्या अभंगातील वाङ्मयीन सौंदर्य शक्ती स्थळे **डॉ.ईश्वर सोमनाथे** | 234 |
| 49 | योगासन करा व निरोगी राहा **डॉ.के.डी. दापके** | 242 |
| 50 | फेसाटी कादंबरीतील विदारकतेचे आकलन **प्रा.वंदना नेमाडे** | 245 |
| 51 | उच्चमाध्यमिक शाळेतील विध्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा त्यांच्या संपादनुकीशी असलेली सहसंबंध अभ्यास **डॉ.विजेंद्र पुराणिक** | 249 |
| 52 | यशवंतराव होळकर यांच्या कार्याचा संक्षिप्त परिचय **डॉ.शिवाजी वाघमोडे** | 253 |
| 53 | 'जागतिकीकरणात माझी कविता' बदलत्या मुल्यव्यवहाराचे चित्रण **अरुण शिवाजी ठोके** | 259 |
| 54 | संत तुकारामांचे देवत्व विषयक प्रबोधन **डॉ.अशोक लिंबेकर** | 262 |
| 55 | 'मंगेश नारायणराव काळेंची कविता' – समकालीनतेची अनुभूती **अरुण शिवाजी ठोके** | 265 |
| 56 | पर्यटन क्षेत्र व भारतीय अर्थव्यवस्था **डॉ. राजू शिंदे** | 269 |
| 57 | आधुनिक काळातील ग्रंथालयातील बदलाचे व्यस्थापन **प्रा.लोहकरे रोहिदास** | 273 |
| 58 | भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचा सहभाग **डॉ. डी. एम. ढगे** | 279 |
| 59 | १९९० पर्यंतची दलित नाटके व रंगभूमी **डॉ. भाऊसाहेब गमे** | 281 |
| 60 | प्राचीन भारतातील पोलीस यंत्रणा : एक चिकित्सक अभ्यास **प्रा. आर.एन. हुरगुळे** | 285 |
| 61 | भारतीय स्त्रीवादाचे राजकारण स्थिती व फलनिष्पत्ती **प्रा. एच.एस. कुचेकर** | 291 |
| 62 | प्रेमानंद गज्वी यांचा कथासंग्रह-'ढिवर डोंगा' : कथालेखनातील वेगळा प्रयोग **विनोद भालेराव** | 296 |
| 63 | अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्यांचे अध्ययन **डॉ. अभय लाकडे** | 301 |
| 64 | नागपूर जिल्ह्याचे राजकीय व सामाजिक विश्लेषण **डॉ. मंगेश आचार्य** | 306 |
| 65 | भाषांतर शास्त्र की कला? **प्रा. प्राची जोशी** | 318 |
| 66 | कुणबी जाकी तियात्रगितातंल्यान व्यक्त जाल्लो कुणबी समाजाचो आर्त सूर **प्रा. ग्लिनीस डायस** | [illegible] |

RESEARCH JOURNEY International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Multidisciplinaru Issue
UGC Approved Journal
Vol. - V, Issue-I(B)
ISSN : 2348-7143
Jan.-Feb.-March 2019

# प्राचीन भारतातील पोलीस यंत्रणा - एक चिकित्सक अभ्यास

**प्रा. एन. आर. हुरगूळे**
समाजशास्त्र विभागप्रमुख
शिवाजी महाविद्यालय,हिंगोली.
मो.९८८१९४१३२९

**प्रस्तावना**

मानवी समाजाचा इतिहास जितका जुना आहे. तितकाच मानवी प्रवृत्तीचा इतिहास सुध्दा जुना आहे. मानवी समाजामधील सर्वच व्यक्ती सुसंस्कृत असत नाहीत. तर काही व्यक्ती गुन्हेगारी किंवा अपराधी वृत्तीचे असतात, म्हणून असे म्हणता येते की. मानवी इतिहास इतकाच जुना इतिहास गुन्हा किंवा अपराधाचा आहे. प्रत्येक मानवी समाजात प्रत्येक कालखंडात अपराधी वृत्तीचे मानव अस्तीत्वात होते. तसे त्या अपराधी वृत्तीला प्रतिबंध घालणारी व्यवस्था देखील प्रत्येक समाजात त्या त्या कालखंडात अस्तित्वात होती. समाजाच्या कल्याणासाठी त्या समाजात कोणावर अन्याय अत्याचार होणार नाही किंवा इतर घटकाचा त्रास होणार नाही. याची खबरदारी घ्यावी लागते. तशी खबरदारी घेणारी यंत्रणा प्रत्येक समाजात अस्तीत्वात होती.

व्यक्तींच्या समाजविराधी वर्तनामुळे समाजात नवनवीन प्रश्न किंवा समस्या निर्माण होऊ लागल्या होत्या. एका काळात निर्माण झालेले प्रश्न, समस्या हया दुसऱ्या काळात किवा परावर्तीत काळात तशाच असतील याची शाश्वती नसते. शासकासमोर निर्माण झालेले प्रश्न, समस्या हे सोडवून जनकल्याणाचे धोरण समोर टेवुन लोकराज्य कल्पनेद्वारे त्यांना कामकाज करावे लागत होते. त्यामुळे त्यांना योग्य अंमलबजावणी करावी लागली. अशा प्रकारे सर्वांच्या मान्यतेने समाजातील व्यक्तींचे वर्तन निश्चित करावे लागले. या माध्यमातुन आपला राज्यकारभार चालवुन समाजात शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्याचे कार्य हया शासकांनी केले.

व्यक्ति वैयक्तीक प्रगती करत असतांना त्याच्या स्वार्थीवृत्तीमुळे तो सामाजिक नियमाचे उल्लंघन करतो. त्याच बरोबर समाजातील दुबळया घटकावर अन्याय सुध्दा करतो. तेंव्हा समाजातील सर्व घटकांना समान न्याय मिळावा व एखाद्या घटकावर अन्याय होत असेल तर तो दुर करण्यासाठी एक विशिष्ट यंत्रणेची आवश्यकता असते ती पुर्ण करण्याचे कार्य हे पोलीस प्रशासन करते. सर्व पाश्चिमात्य राष्ट्रात प्राचीन काळापासुन नगरपालिका आणि तत्सम इतर स्थानिक स्वराज्य संस्थान कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम करीत असल्यामुळे कालांतराने पोलीस या शब्दाला अधुनिक अर्थ प्राप्त झाला. लोकांच्या जिवित्वाचे रक्षण करणे, गुन्हयाला आळा घालणे, घडलेले गुन्हे हुडकुन काढुन आरोपीला पुराव्यानिशी न्यायासनासमोर हजर करणे, समाजात शांतता सुव्यवस्था प्रस्थापित करणे इत्यादी कामाचा समावेश पोलीसांच्या कर्तव्यात होतो.[१] याशिवाय जस-जशी समाजात जटीलता वाढत गेली. तसतसे कामाचे स्वरुप वाढत गेले त्याबरोबर अधूनिक समाजात तर अनेक प्रश्न किंवा समस्या वाढत गेल्या हया सर्व प्रश्न व समस्या मुळे समाजातील कायदा व सुव्यवस्था धोक्यात आली. ती राखण्यासाठी पोलीस प्रशासनाच्या सतर्क राहावे लागते. त्यामूळे त्यांना बऱ्याचदा अधिकचे काम करावे लागते. अशी कामे करत ते जनतेच्या रक्षणार्थ सदैव उभे असतात.

**शोधनिबंध लेखनाचा उद्देश**

प्रस्तुत शोधनिबंध लेखनाचा उद्देश पुढीलप्रमाणे आहे.

१. भारतीय पोलीस दलाचा इतिहास जाणुन घेणे.
२. भारतीय पोलीस दलाच्या विकासाचा आढावा घेणे.

**पोलीस शब्दाचा अर्थ व व्याख्या**

स्वतंत्र समाजात पोलीस बनने हे एक अवघड कार्य आहे. कारण पोलीसांच्या व्यवसायात असाधारण कौशल्य आणि उच्च कोटीचे चारित्र्य असणे अपेक्षीत असते. कोणत्याही लोकशाही समाजात पोलीस हा शांतता व सुव्यवस्थेचे साधण असते. कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचे कार्य करित असतो. त्याच्या या कार्यामुळे समाजातील लोक स्वत:ची कार्य कर्तव्य मोकळेपणाने करु शकतात.[२]

पोलीस हा शब्द ग्रीक वाङ्मयातुन आलेला असुन तेथील 'पोलीकस' या शब्दापासुन तो बनविलेला आहे. पोलीस म्हणजे नागरी सेवकांचे केलेले एक कर्तव्य असते त्याच्यापासून समाजास कायद्याचे संरक्षण प्राप्त होते. या कायद्याव्दारे गुन्हा प्रतिबंधक वातावरण समाजात निर्माण होऊन समाजातील कायद्याची अंमलबजावणी होते. पोलीस म्हणजे जनकल्याणासाठी कार्य करणारी शक्ती असून त्याद्वारे संपत्ती आणि स्वातंत्र्य यांच्यावर नियंत्रण ठेवले जाते.[३] पोलीस संकल्पनेत केवळ शासनाचे संरक्षण आणि समाजातील शांतता आणि सुव्यवस्था एवढेच अपेक्षीत नाही तर समाजातील जिवित आणि वित्त यांचे संरक्षण केले जाणे देखील अपेक्षीत आहे.

ऑक्सफर्ड शब्द कोषानुसार पोलीस म्हणजे कायदा व सुव्यवस्था ठेवणारे तसेच त्यांचे नियंत्रण करणारे संघटन होय. पोलीसांना कायदा व सुव्यवस्था ठेवण्यासाठी सरकारी कोषातुन वेतन दिले जाते.

लॅटीन भाषेत पोलीस शब्दाचा अर्थ 'पुलिटीचा' याचा अर्थ पोलीसांचे राज्य होय. पोलीस असे संघटन आहे की, ज्याचे मुख्य कार्य सुव्यवस्था स्थापन करणे होय. तसेच गुन्हेगारी कमी करुन कायद्याचे राज्य निर्माण करणे होय. समाजाच्या सुरुवातीच्या काळात पोलीस संघटन साधे व सरळ होते. लोकसंख्या वाढ व प्रसार माध्यमांचा विकास त्यामुळे पोलीस संघटन गुंतागुंतीचे बनत गेले. राज्याच्या प्रशासनाचे अंग म्हणुन पोलीस संघटनेकडे बघीतले जाते.[४]

पोलीस शब्द युनानी भाषा पॅलीटीचा अर्थ लॅटीन भाषातील पलिसिआ या दोन शब्दापासुन निर्माण झाला आहे. या मधुन पॉलीटी तथा पॉलीसी जसे शब्द निर्माण झाले. पॅलीटीचा अर्थ नागरिकता किंवा राज्य किंवा सभ्यतेचे प्रशासन, लॅटीन समानार्थी शब्दाचे तात्पर्य राज्य किंवा प्रशासन किंवा सभ्यता यांच्याशी संबधीत आहे. त्याचप्रमाणे फ्रान्स शब्द पॅलीस, नगर किंवा कसबा चा बोध होतो. पॉलीटी शब्द असा समुह स्पष्ट करतो. जो व्यवस्था किंवा सरकार अंतर्गत संघटीत होतो.[५]

ऑगस्ट वुल्मर मते, आदर्श पोलीस अधिकाऱ्यामध्ये सोलोमनची बुध्दीमता, डेव्हीडचे धैर्य, सेमसनची शक्ती, जेकबची सहनशक्ती, मिजेंसचे नेतृत्व, सम्राटाची दयाबुध्दी, आलेक्झांडरची नियोजन बध्दता, डॅनियलचा विश्वास आणि लिंकनचे राजकरण पटुत्व आणि शेवटी भौतिक व सामाजिक विज्ञान-तील माहिती आणि ज्ञान आवश्यक असते. ही कल्पना पोलीस ॲन्ड सोसायटीज या ग्रथांत वुल्मरने मांडली आहे.[६]

**पोलीस दलाचा इतिहास**

भारतीय पोलीस दलाचा इतिहास जाणुन घेण्याचा प्रयत्न केला असता असे दिसून येते की, तो फार प्राचीन आहे. त्याचे संदर्भ इसवीसनपुर्वीपासून सापडतात. म्हणजे भारतीय पोलीस दल इ.स. पुर्व २०० ते ३०० पासुन अस्तीत्वात आहे.

चंद्रगुप्त मौर्य यांच्या राज्यात त्यांचे गुरु कौटील्य यांनी लिहिलेल्या **'अर्थशास्त्र'** या ग्रंथात पोलीसांच्या कार्यासंबधी माहीती पाहावयास मिळते. त्यांनी गुप्त पोलीसांना 'गुढपुरुष' हा शब्द त्यावेळी वापरला आणि राज्यात पोलीसांची व्यवस्था प्रबल असली पाहिजे असे प्रतिपादन केले.[३] फ्रांसमधील सातवा चार्लस १४०१-६१ याने एकदा तसा प्रयोग करुन पाहीला होता. पण तो पुर्णतः फसला. १८२९ साली इंग्लंडमध्ये ही मेट्रोपोलियन पोलीस दलाची उभारणी करण्याचा कायदा पार्लमेंटने केला. पण त्याला आणि त्या नुसार उभारलेल्या दलाला जनतेच्या निकषाच्या विरोधाला तोंड दयावे लागले. १८३३ साली तर जनता आणि नवे पोलीस दल यांच्यात उघड-उघड संघर्ष झाला.[७]

समाज हा परिवर्तनशिल आहे समाज बदलला तसे पोलीस प्रशासन देखील बदलत गेले. भारतात त्याच बरोबर महाराष्ट्रात पोलीस दलांचा इतिहास फार प्राचीन आहे. भारतात पोलीस कायदा १८६३ मध्ये तत्कालीन इंग्रजी राजवटीत अस्तीत्वात आला. हा कायदा अस्तीत्वात येण्यापूर्वी महाराष्ट्रात पोलीस यंत्रणा अस्तीत्वात होती. असे असले तरी महाराष्ट्रातील पोलीस कायदा स्वातंत्र्यानंतर १९५१ मध्ये मुंबई राज्यात पहिल्यांदा अस्तित्वात आला. त्यानंतर पोलीसांची भूमिका, बोधवाक्य, उदिष्टे, पोलीस दलाची रचना, पोलीसांची संख्या, लोकसंख्येतील प्रमाण, पोलीसाविषयीचे त्याचे धोरण ठरवण्यात आले. तेव्हापासुन महाराष्ट्रातील पोलीस, बृहन्मुंबई पोलीस दल, सौराष्ट्र, कच्छ, हैद्राबाद, विदर्भ या ठिकाणची पोलीस यंत्रणा एकत्रित कार्य करीत असे. त्यापुर्वी "बॉम्बेडिस्ट्रिक्ट पोलीस ॲक्ट १८९०" व मुंबई शहरासाठी "सिटी पोलीस ऑफ बॉम्बे ॲक्ट १९०२" हे पोलीस दलाशी संबधीत कायदे अस्तित्वात होते. त्या वेळेचा महाराष्ट्र हा संयुक्त महाराष्ट्र होता.

प्राचीन काळी भारतात विविध राजे आणि त्यांची राज्य अस्तित्वात होती. त्यांची संख्या किती होती हे जरी निश्चित नसले तरी त्यांची सैन्यदले असेल आणि ती परस्पर वेळ प्रसंगी युध्द करत. त्या वेळी कोणत्याही राजाची

शक्ती म्हणजे त्या राजाचे सैन्य असे. सैन्यातील जवान व पोलीस हे एकच असत. स्वत:चे सामर्थ्य वाढविण्यासाठी राजे सैन्याच्या जोरावर नविन भुभाग संपादन करत व संपादित भुभागावरील लोकांची लुट करत. व स्वत:चे सामार्थ्याचे प्रदर्शन करत. कालांतराने स्वत:च्या शक्तीचे प्रदर्शन करणे मागे पडले आणि लोकांमध्ये जागृती निर्माण झाल्यामुळे जीवित आणि वित्ताचे संरक्षण होण्याची गरज समाजात निर्माण झाली.

भारतातील पोलीस प्रशासनाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली ती इंग्राजाच्या आगमनानंतरच्या काळानंतर. पाश्चिमात्य देशातील पोलीस राज्य किंवा शहर राज्ये ही संकल्पना इंग्रजानी सर्वप्रथम मुंबईत राबवली. प्रत्येक इंग्रज हा स्वत:ला एक पोलीस समजत असे. त्यामुळे भारतात प्रवेश केल्याबरोबर व्यापार करण्याच्या उदेशाने आलेले इंग्रज सुरुवातीला त्यांच्या व्यवहारात येणाऱ्या अडचणी दुर करण्यासाठी, स्वत:च्या संपत्तीचे संरक्षण करण्यासाठी, स्वत:च पोलीसांची कार्य पार पाडण्याचा प्रयत्न करु लागले. त्यावेळी जमिनदार राजे, जहागीर दार, संस्थानिक भारतात अस्तित्वात होते.[८] पाश्चात्य देशात सुरुवातीला पोलीस व जनता यांच्या संघर्ष झाला. कारण लोकांना हेच माहीत नव्हते की, संरक्षणासाठी किंवा सुव्यवस्थेसाठी कोणाची तरी दुसऱ्या ची मदत घेणे आवश्यक असते. आज हे तत्व सर्व मान्य झाले आहे की, अंतर्गत कायदा, शांतता, सुव्यवस्था ही सर्व मान्य झाले आहे की, अंतर्गत कायदा, शांतता, सुव्यवस्था ही सर्व कार्ये पार पाडणारी एक स्वतंत्र यंत्रणा उपलब्ध आहे. आणि अशी यंत्रणा असणे आवश्यक आहे.

भारतात पोलीस दलाची सुरुवात नेमकी केंव्हा झाली हे जरी निश्चित नसले, तरी ती प्राचीन काळात झाली आहे असे म्हणता येईल कारण त्या संबंधीची पुरावे सुध्दा उपलब्ध आहेत. अर्थात पोलीस दलाची उत्पत्ती व विकास हा प्राचीन काळात झाला असुन अशाप्रकारच्या विकासाची प्रक्रिया पुढिल प्रमाणे चार टप्यात सांगता येते.

१) प्राचीन भारतातील पोलीस यंत्रणा
२) मध्ययुगिन भारतातील पोलीस यंत्रणा
३) ब्रिटीशकालीन भारतातील पोलीस यंत्रणा
४) स्वातंत्र्योत्तर काळातील पोलीस यंत्रणा

**प्राचीन भारतातील पोलीस यंत्रणा**

मानवाच्या अमर्याद गरजा आहेत. त्या मानवी समाजाच्या विकासाच्या अवस्थे बरोबर निर्माण झाल्या आहेत. ह्या अनेक गरजा पैकी एक गरज मानवी समाजाला निर्माण ती म्हणजे संरक्षणाची. ही गरज पूर्ण करण्यासाठी तशी यंत्रणा समाजात निर्माण होणे गरजेचे होते. म्हणुन संरक्षणाची गरज पूर्ण करण्यासाठी राज्यसंस्था निर्माण झाली असावी. व्यक्तिला स्वत:चे संरक्षण स्वत: करता येत असले तरी जेंव्हा समाजाच्या संरक्षणाचा प्रश्न येतो तेंव्हा इतरांची संरक्षणाच्या कल्पनेत जीविताचे संरक्षण आणि संपत्तीचे संरक्षण या दोन्ही गोष्टी करणे आवश्यक असते. समाजाच्या विकासात संपत्तीचा विकासही होत गेला आणि जीवित व वित्त संरक्षणाची गरज मानवाला वाटु लागली. यामुळे आधुनिक समाजात अर्थसंस्था आणि राज्यसंस्था विकसित होउन या संस्थानी समाजात अधिक प्रभावी पणे काम केले. सुरुवातीला या दोन्ही संस्था कुटुंब आणि धर्मसंस्थेच्या स्वरुपात कार्य करीत असत. समाज विकासाच्या प्रतिक्रियेत या दोन्ही संस्था स्वतंत्र होउन त्यांनी प्रभावी पणे कार्य केले.

आज जनतेच्या जीवितांचे आणि वित्ताचे संरक्षण करणे हे राज्याचे कर्तव्य मानले जाते. हे कार्य राज्यसंस्था प्राचीन काळापासुन पार पाडते. राजा हा प्रजेचा पिता आहे हि कल्पना याच अर्थाने आली आहे. समाजात कोणतीही घटना घडली तरी त्यासाठी राजाला जबाबदार धरण्यात येत असे. प्राचीन काळात देखील गावात गुन्हा घडल्यास नगर रक्षकांनांच त्यासाठी जबाबदार मानले जाई.[९] भारतासारख्या देशात प्राचीन काळापासुन रात्रदिवस संरक्षणाची कामे रक्षकाकडेच दिलेली असत, तेच रात्रीची गस्त घालीत असत आणि कोणाचा संशय आला तर झडती घ्रण्याचे काम त्यांचेच असे. वाहन, व्यक्ती, दुकान, घर इत्यादीची झडती घेउन गुन्हेगाराचा शोध जात असे.

**१. वैदिक कालखंड**

भारताच्या वैदिक कालखंडा पासुन समाजात शांतता आणि सुव्यवस्था राखणारी यंत्रणा म्हणुन पोलीसांचा उल्लेख आलेला आहे.[१०] गुन्हयाचा शोध घेणे, गुन्हेगारी प्रतिबंधक वातावरण तयार करणे आणि त्यासाठी आवश्यक असणारी कौशल्ये आत्मसात करणे या गोष्टीचा उल्लेख मनुस्मृतीमध्ये आढळतो.[११] ऋग्वेद हा सर्वात जुना वेद असुन त्यामध्ये गुन्हे आणि शिक्षा या सारख्या बाबीचा उल्लेख सापडतो.[१२] अथर्ववेद काळात देखील असेच उल्लेख सापडतात.[१३] त्यावेळी राजा स्वत: जवळ गुप्तहेर बाळगीत असे आणि रात्रीच्या वेळी रस्त्यावरुन

स्वत: गस्त घालीत असे. गुन्हेगारी वर नियंत्रण ठेवण्याचे त्याच बरोबर शांतता राखण्याचे कामही राजा करीत असे.

२. **संस्कृत वाङमय**

संस्कृत वाङ्मयात मृच्छकटीक आणि शाकुंतल या संस्कृत नाटकात पोलीसाचा उल्लेख केला आहे.[१४]

३. **कौटील्याचा अर्थशास्त्र ग्रंथ**

इ.स. पुर्व ३१० मध्ये कौटील्याने लिहलेल्या अर्थशास्त्रात गुन्हयाच्या तपासाच्या पध्दतीचा उल्लेख येतो. तसेच शिक्षा देणारी यंत्रणा आणि गुन्हयावर नियंत्रण करणारी यंत्रणा या संबंधीचे विचार तिथे पाहावयास मिळतात. गुप्तहेराचे नऊ प्रकार कौटील्याने अर्थशास्त्रात सांगितलेले आहेत. त्यात स्त्री हेरांचा सुध्दा उल्लेख केला आहे.[१५] गुन्हे, तपास, शिक्षा, धरपकड, गुन्हा घडलेली परिस्थिती या सर्वांचा शोध घेण्याचे कार्य कशा रितीने केले जावे. हे कौटील्याने अर्थशास्त्रात सांगितले आहेत. या संदर्भातील कौटील्याचे विचार तात्विक आणि तर्काधिष्ठीत आहेत असे दिसते. कौटील्याच्या काळातच गुन्हेगार शोधणे आणि त्याला अटक करणे याच्याशी संबंधीत कायदे व नियम तयार करण्याचे कार्य झालेले दिसते.[१६] या कार्यासाठी स्वतंत्र यंत्रणा असावी असे कौटील्याचे मत आहे. राजा हा प्रजेचा पिता असुन त्याने प्रजेला शिक्षण दिले पाहीजे. तसेच प्रजेचे रक्षण व त्यांचे पोषण हे कार्य देखील राजाचेच कर्तव्य मानले जात असे. कौटील्याच्या काळातच वरील प्रकारच्या कल्पना अस्तित्वात आल्या होत्या. एखादयाची वस्तु जर चोरीस गेली तर ती शोधुन देण्याचे काम राजाचेच असे. तसे न झाल्यास त्याचा मोबदला राजाला दयावा लागे.

कायदा व सुव्यवस्था राखणे हे राजाचे कर्तव्य मानले जात असे.[१७] चोरी, गुन्हे, दरोडा, खुन हे राजाविरुध्द व शासनाविरुध्द कार्य मानले जात असे.[२४] लोंकाना परस्परांच्या सहाय्यासाठी धावुन जाण्यास तयार करणे हे पोलीस अधिकाऱ्यांचे कर्तव्य मानले जात असे. प्राचीन काळात पोलीसाकडे सार्वजनिक आरोग्याची काळजी घेणे, अनैतिक व्यवसाय बंद करणे, शेतीच्या वादात तडजोड घडवुन आणने. या सारख्या जबाबदाऱ्या देखील सोपविल्या जात असत.[२४] कोणतीही समाज विरोधी कृती ही शासनाविरुध्द कृती मानली जात असे.

४. **गुप्त काळ**

गुप्त काळात पोलीस खात्यात अनेक सुधारणा करण्यात आल्या. प्रतीहार इ.स. ४०० - १०३०, पांडेय इ.स. ४०० - १३१०, सेन इ.स. १११४ - ११९९, पाल इ.स. ७४० -११९४, इत्यादी घराण्यातील राज मंत्र्याच्या दर्जाचा एक पोलीस प्रमुख नेमत असत.[२६] त्यास दंडीक, दंडपारीक इत्यादी संज्ञा असत. राजा प्रतिहाराची मांडलिक सुध्दा आपआपल्या राज्यात दंडपारीकाच्या नेमनुका करीत असत. बंगालच्या पाल राजाचे दंडशक्ती नावाचे स्वतंत्र पोलीस खाते होते.[१८]

**प्राचीन भारतातील पोलीस यंत्रणेचे कार्ये**

१. राजाला कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या कामात सहकार्य करणे हे प्रत्येक प्रजाजनाचे कर्तव्य मानले जाई.[१९]
२. चोरी, मारामारी, आग, आपत्तीच्या प्रसंगी शेजाऱ्याच्या मदतीसाठी गेले पाहिजे असा कायदा होता. कर्तव्य टाळण्यास दंड किंवा शिक्षा त्यावेळी दिली जात असे.
३. लोकांनी परस्परांना सहाचार्याने संकट काळात मदत केलीच पाहिजे असे मानले जात होते. म्हणून त्यावेळी प्रत्येक जण एकमेकांच्या मदतीला धावून जात असत.
४. प्राचीन काळात सार्वजनीक आरोग्य, अनैतिक व्यवसायास आळा घालणे, शेतीच्या भांडणात तडजोड करणे, जुगार व मद्यपान नियंत्रित करणे या सारख्या जबाबदारीची कामे पोलीसांकडेच असते.
५. कायदा व सुव्यवस्था राखणे आणि गुन्हयाचे प्रतिबंधन करणे अशी अनेक कार्य पोलीस प्रशासनात केली जात असत.[२०]

कौटिल्याच्या अर्थशास्त्रात या सर्वांचा उल्लेख आहे.[१९] तिरुवल्लुर इ.स. पहिले शतक या प्रसिध्द तामिळ कविने लिहिलेल्या एका ग्रंथात आढळते कि, चोरी, लबाडी, लाचलुचपत इत्यादी गुन्हयांचे अनेक प्रकार असुन गुन्हेगार कशा रितीने पकडावेत या विषयीची माहिती कौटिल्य व तिरुवल्लूर या दोघांनाही सांगितलेली आहे.

**प्राचीन काळातील पोलीस प्रशासनातील पद व कार्य**

प्राचीन काळातील पुराव्याच्या आधारे असे म्हणता येते कि, त्या काळात पोलीस प्रशासनात अनेक अधिकारी वेगवेगळया पदावर कार्य करित असत. त्यांच्या पद व कार्याविषयीचे विवेचन खालीलप्रमाणे आहे.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013) | Multidisciplinary Issue | Jan.-Feb.-March 2019
UGC Approved Journal

तक्ता क्र.१

**प्राचीन काळातील पोलीस प्रशासनातील** पद व कार्ये

| अ.क्र. | पद | कार्य |
|---|---|---|
| १ | ग्रामीणी | ग्रामप्रमुख |
| २ | कोरागृहा | चोर पकडणारा |
| ३ | रक्षिणाह | हवालदार |
| ४ | कोरारज्जुका | दरोडेखोरांना अटक करुन तुरुंगात टाकणारा अधिकारी |
| ५ | युरधारनका | चोरी केलेल्या वस्तु गोळा करणे आणि इतर गुन्ह्याबाबत कार्य |
| ६ | दंडनायक | तुरुंगातील कैद्यावर लक्ष ठेवणे, त्यांना शिक्षा देणे |
| ७ | दंडपासिहा | तुरुंगातील कैद्यावर लक्ष ठेवणे |
| ८ | दंडाधिपती | मुख्य पोलीस अधिकारी |
| ९ | गाठ-भाट | गुन्हे शोधन्याचे कार्य |
| १० | राजस्थानिय | एक अधिकारी |
| ११ | गढपुरुष | गुप्तहेर |
| १२ | महादंडनायक | उच्च श्रेणीतील अधिकारी |

पोलीस प्रशासनातील खात्याच्या कार्यात केलेल्या बदल आपले आढळुन येतात. कारण समाजातील लोंकाचे वर्तन हे धर्म आणि निती नुसार केले जात असे न्याय बरोबर रुढी व प्रंपराचा प्रभाव हा तत्कालीन समाजावर होता.वैदिक कालखंडात राज्यांचे भौगोलिक क्षेत्र महत्वाचे घेत असे. आणि पोलीस प्रशासन राजाच्या कामकाजाचा महत्वाचा घटक असे.[२१] गुन्ह्याचा शोध घेणे गुन्हेगारांना अटक करणे या बरोबर त्यांना न्यायालयीन व्यवस्थेसमोर हजर करण्याच्या कामात राजा पुढाकार घेत असे

**निष्कर्ष**

प्रस्तुत विषयाच्या अभ्यासाअंती आलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत

१. पोलीस दलाची उत्पत्ती व विकास हा प्राचीन काळात झाला.
२. समाजातील एखाद्या घटकावर अन्याय होत असेल तर तो दुर करण्याचे कार्य हे पोलीस प्रशासन करते.
३. प्राचीन काळात पोलीस प्रशासन राजाच्या कामकाजाचा महत्वाचा घटक होते.
४. प्राचीन काळात पोलीसाकडे सार्वजनिक आरोग्याची काळजी घेणे, अनैतिक व्यवसाय बंद करणे, शेतीच्या वादात तडजोड घडवुन आणने. या सारख्या जवाबदाऱ्या देखील सोपविल्या जात असत

**सारांश**

भारत देश हा संस्कृतीप्रधान देश आहे. आज जगात भारतीय संस्कृतीला एक श्रेष्ट असे स्थान आहे. फार प्राचीन काळापासुन हया संस्कृतीची निर्मिती झाली आहे. व सामाजिकरणाच्या माध्यमातुन एका पिढीकडुन दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरण झाले आहे. व्यक्तीच्या व समाजव्यवस्थेच्या जडणघडणीमध्ये संस्कृती ही मानवामधील पशुत्ववृत्तीचा नाश करून मानवतेचा विकास करण्याचे कार्य करते. खऱ्या अर्थाने मानवता धर्म टिकवण्याचे कार्य संस्कृतीच्या माध्यमातुन झाले आहे. भारतीय समाजव्यवस्थेची जडणघडण प्रादेशिकता, भौगोलीकता: जाती व्यवस्था आणि विविध क्षेत्रातील चालीरीती, परंपरा, सामाजिक व्यवहार यावर अवलंबुन आहे. या भिन्नता आणि दळण-वळणाच्या साधण्याच्या अभावामुळे समाजात एक मत निर्माण झाले नाही. या शासकांची समाजातील गुन्हेगारी प्रवृत्ती नष्ट करुन कल्याणकारी समाज निर्माण करण्याकडे आपले लक्ष केंद्रीत केले. यासाठी एका विशिष्ट यंत्रणेची आवश्यकता शासकाला निर्माण झाली. व त्यांनी तशा प्रकारची यंत्रणा त्या - त्या काळात निर्माण केली.

**संदर्भ सूची**

१) जोशी, लक्ष्मणशास्त्री..(१९८१).मराठी विश्वकोष, मुंबई महाराष्ट्र विश्वकोष निर्मिती मंडळ, खंड १० वा आवृत्ती संपादन.१९८०

२) Reddy,Sreekanth., "Training Police officers", Edited Volume, G. Ram Reddy and K. Sesharei.,( 1972) Developing society and Police., Hyderabad, Osmania university, 144
३) Sen, Shankar., (1986) "Police Today", New Delhi,Asia Publishing House, 692
४) लाडिया, बी. एल.,(१९८७), भारत मे लोकप्रशासन, आग्रा, साहित्य भवन पब्लिकेशन,६९२
५) शर्मा, ब्रजमोहन.,(१९८९), भारतीय पुलीस, जयपुर, पंचशील प्रकाशन,०७
६) Reddy,Sreekanth., "Training Police officers", Edited Volume, G. Ram Reddy and K. Sesharei.,( 1972) Developing society and Police., Hyderabad, Osmania university, "The New Encyclopedia of Briranica", (Vol-25), 15 Edition, Chicago,957
७) Mahajan,V. D.,(1990),"Ancient India", Delhi, S. Chand & Company Ltd., Ram Nagar,19
८) Tripathi, Ramkshankar.,(1987), "History of Ancient India",NewDelhi, Motilal Banarisdass Pvt. Jawahar Nagar,. 27
९) Mahajan,V D.,(1990),"Ancient India", Delhi, S. Chand & Company Ltd., Ram Nagar,19
१०) Tripathi, Ramkishan., (1987), "History of Ancient India", Motilal Banarisdass Pvt. Jawahar Nagar New Delhi, P. 157
११)Grover,Virender.,(1999) "Government Structure Political Process and Adminstration in India", New Delhi, Deep & Publication,333
१२) Vincent A. Smith., "The Early History of India", New Delhi. Atlantic Publishers and Distributors, 23
१३) Bakshi, S. R., (1995) "Advanced History of Ancient India",New Delhi,Anmol Publication, Pvt. Ltd,187
१४) Grover,Virender.,(1999),"Government Structure Political Process and Adminstration in India", New Delhi, Deep & Publication,23
१५) Vincent, A. Smith., (1999), "The Early History of India", Atlantic Publishers and Distributors, New Delhi,154
१६) Mahajan, Vidyadhar. (1990), "History of India" (From Beginning to 1526 A.D) New Delhi, S. Chand & Company Limited. Ram Nagar,157
१७) Mahajan, Vidyadhar. (1990), "History of India" (From Beginning to 1526 A.D) New Delhi, S. Chand & Company Limited. Ram Nagar,188
१८) Altekar,A.S.,(1992),"State and Government in Ancient India",New Delhi, Motilal Banarasidass Publisher, Private Limited,259
१९)Bakshi,S.R.,(1995),"Advanced History of Ancient India",New Delhi,Anmol Publication, Pvt. Ltd, 187
२०) Nilkanth Shastri, K.A., Srinivasachari,G.,(1991), "Advanced History of India", Lucknow, Allied Publishers Ltd, 339
२१) Shah, Giriraj.,(1999),"History and organization of Indian Police", New Delhi, Amol Publications, Pvt. Ltd,25